१] शासन, शिक्षण विभागाकडील निर्णय दिनांक ८.२.७४ मधील अनुदान देण्याच्या नियमांची पूर्तता झाली पाहिजे.

२] संबंधित शाळेने/संस्थेने शासनाविरुध्द न्यायालयामध्ये अनुदानाबाबत दावा/याचिका दाखल केलेला नसावा.

३] संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या अथवा कोणत्याही प्रकारचे गैर व्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी नसाव्यात.

४] शाळेतील मंजूर वर्गाकडून नियमानुसार सरासरी हजेरीची अट पूर्ण झाली पाहिजे.

५] सदर शाळेने शासनाकडून वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाचे काटेकोरपणे पालन केले पाहिजे.

६] सदर शाळेमध्ये प्राथमिक शिक्षकांसाठी मान्य केलेली शैक्षणिक अर्हता असलेले प्रशिक्षित शिक्षक नेमणे आवश्यक आहे. शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची भरती करताना यापुढे रोस्टर पाळणे आवश्यक आहे.

७] शाळेतील जे वर्ग अथवा तुकडया सक्षम अधिकाऱ्यांकडून मंजूर करण्यात आलेल्या आहेत त्यांनाच फक्त अनुदान मंजूर करावे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१

प्रत:- मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना माहितीस्तव सादर......

जा. क्र. प्रा/प्राशि/खाप्राशा/अनुदान/पीआर
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक:-
22 MAR 1991

प्रति,

१] शिक्षणाधिकारी [प्राथ.]
जिल्हा परिषद, ____________

२] प्रशासन अधिकारी
म. न. पा. /न. पा. प्राथमिक शिक्षण मंडळ,
जुन्नर जि. पुणे ----

विषय:- विना अनुदानित खाजगी प्राथमिक शाळांना [इंग्रजी माध्यमा-
व्यतिरिक्त] अनुदान मंजूर करणेबाबत...

संदर्भ:- आपले कार्यालयाचे पत्र क्रं. नपशिम/खाप्रा/९०-९१ /२८७
दिनांक ११.१०.९०

शासन, शिक्षण व सेवायोजन विभागाकडील क्रं. व्हीएलएस-७०८८/ [८७७९] /प्राशि-१ दिनांक २८.४.८९ अन्वये शासनाने विहित केलेल्या अटीनुसार ज्या खाजगी शिक्षण संस्थांना १९७३.७४ नंतर विना अनुदानित खाजगी प्राथमिक शाळा [ इंग्रजी माध्यमाव्यतिरिक्त ] उघडण्यास परवानगी देण्यांत आलेली आहे व ज्या शाळा शासनाने प्रत्यक्ष परवानगी दिल्यानंतर तीन वर्षांची अट पूर्ण करीत आहेत. अशा पुढील शाळांना खालील अटींच्या पूर्ततेवर सन १९९०-९१ पासून २५% अनुदान तत्वावर आणण्यास परवानगी देण्यांत येत आहे. पुढे या शाळा टप्पाटप्प्याने अनुदानावर येण्यास पात्र ठरतील.

| अ.क्रं. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव | शेरा |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १] | अंजूमनइ-इत्तेहाद-ए-तरकी ट्रस्ट मुंबई | अंजूमन प्राथमिक स्कूल जुन्नर [उर्दू माध्यम] | २५% अनुदानास पात्र |

न. पा. शिक्षण मंडळ, जुन्नर
आवक क्र. 1901/90-91
दिनांक 26/3/91

२.........